# ज्योतिर्मय

Online Journal of Literature.... साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २०४ वा ❑ मंगळवार दि.३० सप्टेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

## भारताचे स्वदेशी अनंत शस्त्र

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

भारतीय लष्कराने पाकिस्तान आणि चीनचे सीमेवर हवाई संरक्षण अधिक सक्षम करण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे संरक्षण क्षेत्रात स्वदेशी तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देत लष्कराने डीआरडीओ ने विकसित केलेल्या अनंत शस्त्र या जमिनीवरून आकाशात मारा करणाऱ्या अत्याधुनिक क्षेपणास्त्र प्रणालीच्या खरेदीसाठी निविदा काढली आहे.लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी स्वदेशी शस्त्रांना प्रोत्साहन देत आहेत. हवाई संरक्षणाला नवीन रडार, अतिशय कमी पल्ल्याच्या हवाई संरक्षण प्रणाली, जॅमर आणि लेसर-आधारित प्रणालींची आवश्यकता आहे.भविष्यात, जोरावर लाईट टँक आणि इतर हवाई संरक्षण प्रणाली सैन्यात समाविष्ट केल्या जातील. या पाऊलामुळे सैन्य स्वावलंबी होईल.भारत त्या दिशेने प्रयत्न करत आहे .

भारतीय लष्कराने भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड () ला स्वदेशी पद्धतीने विकसित केलेल्या अनंत शस्त्र जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्र शस्त्र प्रणालीच्या पाच ते सहा रेजिमेंटच्या खरेदीसाठी निविदा जारी केली आहे.

ही प्रणाली, ज्याला पूर्वी क्विक रिॲक्शन सरफेस-टू-एअर मिसाईल म्हणून ओळखले जात असे, ती संरक्षण संशोधन आणि विकास संघटनाने विकसित केली आहे. या प्रकल्पाचा अंदाजे खर्च ३०,००० कोटी आहे आणि पाकिस्तान आणि चीनच्या सीमेवर हवाई संरक्षण क्षमता मजबूत करण्याचा उद्देश आहे.

ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानी ड्रोन हल्ल्यांना तोंड देण्यात लष्कराच्या हवाई संरक्षण दलाने  महत्त्वाची भूमिका बजावली. सध्या,  हवाई धोक्यांना तोंड देण्यासाठी भारतीय हवाई दलाच्या समन्वयाने  आणि आकाश सारख्या प्रणाली चालवते.

अनंत शास्त्राची खास वैशिष्ट्ये कोणती आहेत?

ऑपरेशन सिंदूर नंतर लगेचच मे महिन्यात संरक्षण अधिग्रहण परिषदेने या खरेदी प्रस्तावाला मंजुरी दिली. ही मोबाइल प्रणाली सुमारे ३० किलोमीटरच्या रेंजसह हलणारे लक्ष्य शोधू शकते, ट्रॅक करू शकते आणि हल्ला करू शकते, जी विद्यमान  आणि आकाश प्रणालींना पूरक आहे.

अनंत शस्त्र ही एक अत्याधुनिक मोबाइल सिस्टीम आहे जी ८८ हाय-मोबिलिटी वाहनांवर बसवण्यात आली आहे. ती वाळवंटात, मैदानावर आणि पर्वतांमध्ये टँक, बीएमपी आणि तोफखान्यांसोबत काम करू शकते. ती हालचाल करताना लक्ष्य शोधू शकते, ट्रॅक करू शकते आणि त्यावर हल्ला करू शकते. त्याची स्ट्राइक रेंज कमी ते मध्यम रेंजची आहे. स्वदेशी अनंत शास्त्र सिस्टीम ३० किलोमीटरच्या रेंजमधील लक्ष्य नष्ट करू शकते. ती सध्याच्या एमआरएसएएम आणि आकाश सिस्टीमची क्षमता आणखी वाढवेल आणि कमी ते मध्यम रेंजचे हवाई संरक्षण प्रदान करेल. अधिकाऱ्यांनी सांगितले की या क्षेपणास्त्र सिस्टीमची दिवसा आणि रात्री अनेक वेळा चाचणी घेण्यात आली आहे.

अधिकाऱ्यांच्या मते, दिवसा आणि रात्रीच्या परिस्थितीत या क्षेपणास्त्र यंत्रणेची मोठ्या प्रमाणात चाचणी घेण्यात आली आहे. पाकिस्तानशी झालेल्या चार दिवसांच्या संघर्षादरम्यान, ज्यामध्ये चिनी उपकरणांचा वापर करण्यात आला होता, लष्कराच्या हवाई संरक्षण युनिट्सने आकाश आणि एमआरएसएएम तसेच एल-७० आणि ज़ु-२३ हॉवित्झरवर अवलंबून होते, तर भारतीय हवाई दलाने स्पायडर आणि एस-४०० प्रणालींचा वापर केला.

पाकिस्तानने वापरत असलेल्या तुर्की आणि चिनी ड्रोनचा सामना करण्यासाठी आर्मी एअर डिफेन्स नवीन रडार, अतिशय कमी पल्ल्याच्या क्षेपणास्त्र प्रणाली, जॅमर आणि लेसर-आधारित प्रणाली समाविष्ट करण्याच्या प्रक्रियेत आहे. लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी झोरावर लाईट टँक आणि अतिरिक्त स्वदेशी हवाई संरक्षण प्लॅटफॉर्म सारख्या आगामी प्रणालींसह स्वदेशीकरणावर भर देत आहेत.

# आजची नवदुर्गा आयएएस आरती डोगरा-मुर्ती लहान पण कीर्ती महान

## आयएएस अधिकारी आरती डोगरा यांची प्रेरणादायी कहाणी!

ज्योतिर्मय साहित्य

(मोहन चौकेकर) आपल्या समाजात अनेकदा अनेक व्यक्तींकडे, अनेक जणांकडे  त्यांच्या उंचीवरून, त्यांच्या रूपावरून किंवा त्यांच्या शारीरिक रचनेवरून पाहिले जाते. परंतु काही जण, काही व्यक्ती या धारणांना मोडून आपली स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करतात.

अशीच एक प्रेरणादायी कहाणी आयएएस आरती डोगरा यांची आहे, ज्यांनी ३.५ फूट उंची असूनही  सारखी कठीण परीक्षा उत्तीर्ण करून आयएएस अधिकारी बनण्याचे स्वप्न पूर्ण केले. आरतीच्या यशाचा हा प्रवास सोपा नव्हता, पण तिचे धैर्य बुलंद होते, त्यामुळे तिने आपली स्वप्ने पूर्ण केली. चला तर मग आरती डोगरा यांच्या यशाची कहाणी सविस्तर वाचूया, जी तुमच्या स्वप्नांना पंख देईल.

भारतीय प्रशासकीय अधिकारी आरती डोगरा यांनी ३.५ फूट उंची असूनही आपल्या दृढनिश्चयाने आणि कठोर परिश्रमाने संघ लोकसेवा आयोगाची  परीक्षा पहिल्याच प्रयत्नात २००६ मध्ये उत्तीर्ण केली. त्यांनी समाजाच्या रूढीवादी कल्पनांना मोडून काढत, आत्मविश्वास आणि जिद्द असेल तर कोणतेही स्वप्न पूर्ण होऊ शकते हे सिद्ध केले, ज्यामुळे त्या लाखो तरुण तरुणी साठी, युवक युवतीसाठी त्या प्रेरणास्थान बनल्या आहेत.

रूढीवादी कल्पनांना मोडले :

आरती डोगरा यांनी यूपीएससीसारखी कठीण परीक्षा उत्तीर्ण करून आयएएस अधिकारी बनून एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी समाजाच्या रूढीवादी कल्पनांना मोडून काढले. आत्मविश्वास आणि दृढनिश्चयाने कोणतेही स्वप्न पूर्ण होऊ शकते हे त्यांनी सिद्ध केले. आरती डोगरा यांची यशोगाथा तरुण, तरुणींसाठी, युवक, युवकांसाठी खूप प्रेरणादायी आहे.

आरती डोगरा यांचा जन्म राजस्थानमध्ये झाला. त्यांचे शिक्षण डेहराडूनमधून पूर्ण झाले. लहानपणापासूनच त्या अभ्यासात हुशार होत्या. प्रत्येक विषयात त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांची उंची लहान असली तरी त्यांच्या विचाराची उंची आभाळएवढी होती, त्यांचा आत्मविश्वास आणि उत्साह खूप मोठा होता.

आरती डोगरा यांनी केला अनेक आव्हानांचा सामना : आरती डोगरा यांनी प्राथमिक व माध्यमिक शाळेपासून प्रत्येक गतिविधीमध्ये  प्रत्येक कार्यक्रमात भाग घेतला. मर्यादा केवळ विचारांच्या असतात हे त्यांनी सिद्ध केले. यूपीएससी नागरी सेवा परीक्षा ही देशातील सर्वात कठीण परीक्षांपैकी एक मानली जाते. यात यश मिळवण्यासाठी कठोर परिश्रम, सखोल समज आणि मानसिक बळ आवश्यक असते. आरतीने अनेक आव्हानांना तोंड देत ही परीक्षा उत्तीर्ण केली. त्या आयएएस अधिकारी बनल्या. त्यांनी २००६ साली पहिल्याच प्रयत्नात यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली.

आरती डोगरा कामातून निर्माण केला आदर्श :

अधिकारी आरती डोगरा यांचे परिश्रम आणि धैर्य आज लाखो तरुणांसाठी प्रेरणा आहे. आयएएस अधिकारी बनल्यानंतर आरती यांनी आपल्या कामातून हे दाखवून दिले. प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम आणि योग्य विचारसरणीने मोठे ध्येय साध्य करता येते. त्यांनी प्रशासकीय सेवेत अनेक नवीन प्रयत्न केले. त्यांनी समाजातील दुर्बळ घटकांसाठी काम केले. त्यांच्या कार्यामुळे अनेक लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल झाले. आरती डोगरा यांनी आपल्या कर्तृत्वाने समाजासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे.



त्यांच्या यशाने हे सिद्ध होते की शारीरिक मर्यादा यशाच्या मार्गात अडथळा ठरत नाहीत. केवळ दृढ इच्छाशक्ती आणि कठोर परिश्रम महत्त्वाचे असतात. त्यांची कहाणी अनेकांना त्यांच्या स्वप्नांचा पाठलाग करण्यासाठी प्रोत्साहित करते. त्यांच्या प्रशासकीय सेवांमधील योगदानाची दखल घेतली गेली आहे. त्यांनी अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. त्यांच्या कामामुळे प्रशासनात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढली आहे. आरती डोगरा यांचे जीवन हे जिद्द आणि चिकाटीचे प्रतीक आहे. त्यांनी आपल्या यशाने हे दाखवून दिले की कोणताही अडथळा मोठा नसतो. त्यांच्या कार्यामुळे समाजातील दुर्बळ घटकांना न्याय मिळाला आहे.

त्यांच्या यशाची कहाणी आजही अनेकांना प्रेरणा देत आहे. त्यांनी आपल्या आयुष्यात अनेक अडचणींचा सामना केला. पण त्यांनी कधीही हार मानली नाही. त्यांच्या यशाने हे सिद्ध होते की आत्मविश्वास आणि कठोर परिश्रम हेच यशाची गुरुकिल्ली आहेत. त्यांच्या कार्यामुळे अनेक तरुणांना प्रेरणा मिळाली आहे. त्यांनी आपल्या आयुष्यात अनेक आव्हानांना तोंड दिले. त्यांनी आपल्या ध्येयापासून कधीही माघार घेतली नाही.त्यांच्या यशाने हे सिद्ध होते की कोणतेही स्वप्न पूर्ण होऊ शकते. त्यांच्या कार्यामुळे समाजाला एक नवी दिशा मिळाली आहे.

# रा.स्व. संघाचा विजयादशमीचा पथसंचलनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न




ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर (सुधीर कोर्टीकर)–** छत्रपती संभाजीनगरच्या चंद्रगुप्त नगरातील दर्पण उद्यानात राष्ट्रीय स्वयंसेवक संघानी विजयादशमीच्या निमित्ताने पथसंचलनाच्या कार्यक्रमाचे आयोजन देवगिरी प्रांताचे प्रमुख अनिल भालेरावजी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आलेले होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघानी विजयादशमीच्या निमित्याने आयोजित केलेला पथसंचलनाचा कार्यक्रम सायंकाळी बरोबर ५.३० वाजता सुरु झाला. सिडकोच्या एन-३ व एन -४ च्या परिसरातील रस्त्यांवरुन हे पथसंचलन करण्यात आले. सिडको परिसरातील स्त्री पुरुषांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पथसंचलनाच्या स्वागतासाठी अतिशय सुंदर रांगोळ्या सजविलेल्या होत्या. तसेच पथसंचलन करणाऱ्या स्वयंसेवकांवर स्त्री पुरुषांनी विलक्षण आनंदानी पुष्पवृष्टी केली. कार्यक्रमाची सांगता दर्पण उद्यानात ६.३० वाजता करण्यात आली. त्यानंतर सगळ्यांना फळे आणि चहापानाचे आयोजन करण्यात आले होते. सिडको परिसरातील रहिवासी कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी झालेले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पथसंचलनाच्या माध्यमातून संपूर्ण सिडको परिसरात एक चैतन्याचं.. आनंदाचं वातावरण निर्माण झालेले होते.

# वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-५८



*आपल्या ऋषीमुनींनी हजारो वर्षापासून, आज आपल्याला माहिती असलेली ग्रहांची अंतरे सूर्यापासून किती आहेत? हे शोधलेले होते. हेचं ज्ञान आपल्या आधुनिक शास्त्रज्ञांनी अलिकडेच आपल्याला सांगितले. पृथ्वी, सुर्यापासून ९ कोटी,३० लाख, ३००० हजार मैल दुर आहे.*

*हे अंतर १ फूट समजल्यास इतर ग्रहांची अंतरं स्थूलमानाने पुढील प्रमाणे आहेत. बुध-५ इंच; मंगळ-१.५ फुट, हर्षल-१९ फूट, शुक्र- ८.५ इंच, गुरु- ५ फूट, नेपच्युन-३० फूट; पृथ्वी-१ फूट ; शनी- ९ फूट, प्लुटो-४० फूट*


*आपल्याला आपल्या ऋषी मुनींच्या हजारो वर्षांच्या ज्ञानाचा अंदाज यायला वरील उदाहरण पुरेसे आहे. जेव्हा विज्ञान संपते तेव्हा अध्यात्म सुरु होते. हेच सत्य आहे. या ग्रह ताऱ्यांचा आणि त्यांच्यापासून निघणारी तेजो किरणे यांचा पृथ्वीवरील जीवात्म्यांवर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होतो. हा परिणाम त्यांची गती, गुरुत्वाकर्षन या स्वरूपात असतो. आपल्या सृष्टीतील  घटनांचा आकाशातील ग्रहस्थितीशी घनिष्ठ संबंध आहे. जन्मवेळची ग्रहांची वेगळी स्थिती मानवात, त्यांच्या जीवनातील विविधता दर्शविते. जन्मवेळच्या ग्रह-ताऱ्यांसह नक्षत्रादि स्थितीतील "सकारात्मक स्थितीचाच" आपण आपल्या "वास्तुशास्त्र पेंटींग "मध्ये उपयोग करतो*

*आपणांस म्हणजे "वास्तुशास्त्र पेंटींग" ज्यांनी करून घेतले आहे किंवा ज्यांना करावयांचे आहे त्यांनी त्या पेंटींग कडे नियमित पाहायचे आहे.नियमित पाण्याने खूप अद्भुत अनुभव येतात. हे आपल्यापैकी बऱ्याच जणांनी अनुभव घेतलेले असतील. फक्त त्या "पाहण्यात" आपला भाव "सात्विक" असेल तर परिणाम 'सकारात्मकच' मिळतात आणि पाहणं "हेतुंनी युक्त असेल" तर त्या त्या हेतुंच्या तीव्रते प्रमाणे पाहणाऱ्याला होणाऱ्या परिणामांना सामोरे जावे लागते.*

*"पाहण्यात " श्रध्दा-निष्ठा- आपलेपणा- जिव्हाळा आणि विश्वास - पूर्ण पारदर्शकता असेल तर त्याचा परिणाम हा सुखमय आणि आनंद देणारा असतो.कासवांच्या पिलांची आई जर सरोवराच्या दुसऱ्या किनाऱ्यावर असेल तर... आणि जर तिच्या पिलांना भूक लागली असेल तर जेव्हा दोन्ही किनाऱ्यावरील पिले आणि आई यांची नुसती नजरानजर होते तेव्हा पिलांची भूक भागते. त्यांचं पोट भरतं इतकी ताकत दृष्टीत वा पाहण्यात असते. आपण जेव्हा आपल्या "वास्तुशास्त्र पेंटींग" कडे पहातो, तेव्हा ते पेंटींगही आपल्या कडे पहातच असते.*

क्रमश:.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




## जात्यावरच्या ओव्या......

शिवाराच्या वाटा
विहिरी तुडुंब भरल्या
पोटुशी पनाच्या
गोठी मनात दाटल्या ||२७९||

शिवाराच्या वाटा
थांबली बैलगाडी
सईबाई सोबतीन
हाताला धरून वढी ||२८०||

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## आनंदघन : लता मंगेशकर




ज्योतिर्मय साहित्य

रंगुनी रंगात साऱ्या...


रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा अशी कवी आणि गझलकार सुरेश भटांची एक सुंदर गझल आहे. ती चपखलपणे लागू पडते. आजपर्यंत त्यांनी हजारो गीतं गायली. पण तरीही आपलं वेगळेपण, आपल्यातलं माणूसपण त्यांनी टिकवून ठेवलं आहे. लहानपणापासूनच वेगवेगळ्या प्रकारचे भलेबुरे अनुभव अनुभव घेऊनही त्यांच्या स्वभावात कडवटपणा आलेला नाही. त्यांच्या स्वभावातील खेळकरपणा, जीवनाचा आनंद घेण्याची वृत्ती, हास्यविनोदाला दाद देण्याची वृत्ती तशीच टिकवून ठेवली आहे. आजच्या या भागात त्यांच्या याच वेगळेपणाची माझ्या परीने दखल घेण्याचा हा प्रयत्न आहे. कारण दीदींचं जीवन, त्यांचं गाणं आणि त्यांचं व्यक्तिमत्व हे सारं सारं शब्दात बांधणं अवघड आहे.



या गानसम्राज्ञीच्या आतमध्ये काव्याचा आस्वाद घेणारा आणि त्यासंबंधीच्या आपल्या भावना शब्दात तरलपणे व्यक्त करणारा एक साहित्यिक, समीक्षक किंवा एक जाणकार रसिक दडला आहे असे मला वाटते. गंमत म्हणजे रंग माझा वेगळा या सुरेश भटांच्या काव्यसंग्रहाला त्यांनी जी प्रस्तावना दिली आहे, ती त्यांच्या या गुणांची साक्ष देणारी आहे. सुरेश भटांचा हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला, त्याच सुमारास ग. दि. माडगूळकर यांना कवी म्हणावं की गीतकार अशी चर्चा सुरु होती. त्याबद्दल लिहिताना दीदी आपल्या प्रस्तावनेत म्हणतात, तुमची गीते रचनेच्या दृष्टीने इतकी देखणी व बांधेसूद आहेत की या कसोटीला निश्चित उतरतात. गीत कोणते आणि काव्य कोणते, गीतकाराला कवी मानावे की नाही या वादात माझ्यासारखीने पडू नये. पण उत्तम गीत हे उत्तम काव्यही असावे लागते याबद्दल सहसा कुणाचा मतभेद होईल असे वाटत नाही. तसे पाहिले तर ज्ञानदेवांसारख्या महाकवीची मोगरा फुलला, पैल तो गे काऊ कोकताहे, घनु वाजे घुणघुणा किंवा रूप पाहता लोचनी ही गीतेच आहेत ना ? पण त्यातले काव्य अस्सल नाही असे कोण म्हणेल ?

मालवून टाक दीप हे तुमचे गीत उत्तम काव्य म्हणूनही तितकेच परिणामकारक आहे. बोल रे हळू उठेल चांदण्यावरी तरंग या सारखी त्या गीतातील नाजूक आणि रम्य कल्पना गीत गाऊन झाल्यावरही दीर्घकाळ माझ्या मनात तरळत राहिली. आपल्या प्रस्तावनेत पुढे त्या म्हणतात, हे गाणं किंवा जे काव्य कलावंताच्या हृदयातून उत्स्फूतपणे प्रकट होते ते ऐकणाऱ्याच्या हृदयाचा ठाव घेते. त्यात भपका नसेल, ऐट नसेल, पण त्यातली उत्कटता, सरळता आणि प्रांजळपणा हा सरळ आपल्या हृदयात प्रवेश करतो. आपल्या संतकवींची कितीतरी काव्य अशी उत्कट आणि हृदयस्पर्शी आहेत. ही प्रस्तावना बरीच मोठी आहे पण दीदींच्या काव्याच्या मर्मग्राही प्रतिभेचं दर्शन घडवण्यासाठी वरील मजकूर पुरेसा बोलका आहे.

(क्रमशः)



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## मुमुक्षलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

अशा रीतीने जो स्वतः ची निंदा करतो, स्वतःचे असलेले दोष मान्य करतो. ज्याला मनांतून संसाराचा त्रास वाटतो. संसार नकोसा वाटतो, ज्याला सत्संगाची ऊत्कट इच्छा उत्पन्न होतेतो मुमुक्षु होय. पुष्कळ तिर्थे फिरून पाहिली,समाधीसाधने अभ्यासली अनेक ग्रंथाचे अभ्यास पूर्ण पारायणे केली तरी मनाला समाधान झाले नाही. हे सगळे बुद्धीचे अनुमान आहे, कल्पनेचा खेळ आहे असे समजले, हे लक्षात घेऊन संतांना शरण जाण्यास तयार होतो तो मुमुक्षु असतो.

सहा शमदमादि साधने.


१) शम शांतपणा २) दम इंद्रिय दमन ३) तितिक्षा सुखदुःख पचवणे. ४) उपरति अनासक्ति ५) श्रद्धा किंवा शास्त्र सद्गुरूच्या वचनी विश्वास

६) सत्यबुद्धि आणि समाधान किंवा एकविध करण्याची कला देह, कुळ, द्र्व्यदारा आणि इतर गोष्टींचा अभिमान बाजूला सारून जो संतांच्या चरणीं अनन्य भावाने लीन होतो तो मुमुक्षु असतो.

आपला अहंभाव बाजूला सारून जो आपण स्वतः ला अनेकदा अनेक प्रकारची नावे ठेवतों व ज्याला मोक्ष हवा आहे असे वाटू लागतो तो मुमुक्षु असतो. ज्याला लौकिक मोठेपणाची लाज वाटते जो परमार्थासाठी झिजतो. संतचरणीं ज्याचा विश्वास बसतो. संतांबद्दल ज्याला आपलेपणा वाटतो तो मुमुक्षु असतो. प्रापंचिकाचे सर्व व्यवहार बंधने सोडतो व आचरण परमेश्वराच्या चरणाशी वहातो तो मुमुक्षु असतो.

श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघुवीर समर्थ
समास आठवा समाप्त

## सत्समागम म्हणजे संत सांगतील त्याप्रमाणे वागणे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

कोणत्याही मंगल कार्यात सर्वाआधी गणपतीचे आवाहन करतात, आणि सगळे कार्य संपले की सर्वांचे शेवटी त्याचे विसर्जन करतात. त्याप्रमाणे अनुसंधानानेच पोथीला सुरुवात करावी आणि अनुसंधानानेच पोथीची समाप्ती करावी. लौकिक कार्यामध्ये गणपतीचे विसर्जन झाल्यावर आपण शिल्लक उरतो, पण अनुसंधानाचे विसर्जन करताना आपणही त्यात नाहीसे व्हावे. ''जसे ठेवायचे असेल तसे ठेवा, पण आपला विसर पडू देऊ नका, एवढी भीक घालावी,'' अशी गुरूच्या चरणी प्रार्थना करावी.

भगवंताला विसरून भजन करू नका. भगवंताची आठवण ठेवून भाजी जरी आणली तरी त्याचे श्रेय जास्त आहे. जगाच्या लाजेला भिऊन भगवंताला अंतर देऊ नये. 'मी कोण' याचा विचार करावा, आणि तो करण्यासाठी, 'मी नाही कोणाचा' हे बघावे. मी आप्तेष्टांचा, बायको-मुलांचा, आईबापांचा तर नाहीच, पण मी देहाचा आणि मनाचाही नाही; असे करता करता जो राहील तो मी. खरे समाधान एकपणात आहे, अद्वैतात आहे. म्हणून, द्वैताचा जनक जो अभिमान तो कमी कसा होईल हे बघावे. याकरिता, मी कर्ता नसून देव कर्ता आहे असे मानावे, सर्वांभूती भगवद्भाव पाहावा, सत्समागम करावा. सत्समागम म्हणजे सत्याचा समागम. सत्पुरुषाच्या वचनावर विश्वास ठेवून त्याप्रमाणे वृत्ती बनविणे हा खरा सत्समागम आहे. संतांवर अनन्य श्रद्धा ठेवा. त्यांच्या चालीने चाला. त्यांच्या समागमात दैन्य मानू नका. जे तुमची एकसारखी विषयातली नडच भागवतील ते संत नव्हेत. खरे संत विषयाची आसक्ती कमी करतात; अशा संताला शरण जावे. निर्विषय चित्त संतांनाच करता येते. संत हे ईश्वरदर्शनाची तळमळ उत्पन्न करतात. तळमळ उत्पन्न करून देणे हीच संतांची कामगिरी. संतांची भाषा तळमळीची असते, म्हणून ती तळमळ उत्पन्न करते. संत सांगतील त्याप्रमाणे वागावे. जग संतांशिवाय असणेच शक्य नाही. जे देहात दिसले पण वस्तुत: देहातीत राहिले ते संतच होत. आम्हांला त्यांना ओळखता येत नाही याला काय करावे ? नामाच्या योगानेच संत ओळखता येतात, जोडता येतात आणि टिकवता येतात. जो भगवंताचे नाम घेईल त्याला संत भेटेल, आणि तो त्याला भगवंताची प्राप्ती करून देईल. त्याचे कुठे अडणार नाही. पण जो नुसत्या शब्दज्ञानाच्या मागे लागेल त्याला आसक्ती सुटणार नाही, आणि त्याचे जीवन सार्थकी लागणार नाही.

संताच्या पदरात पडले की तो आपली लाज राखतो.

***

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### श्री ज्ञानेश्वरी निर्मितीचे प्रयोजन कोणते?

ज्योतिर्मय साहित्य

असे सदबुद्धी असलेले सिद्ध पुरुष अनेको अनेक निर्माण व्हावेत. त्यांच्या प्रभावातून दुष्टांचा दुष्टपणा कमी व्हावा सर्व भूतमात्रात परस्परात स्नेह निर्माण व्हावा. ही मंगल कामना आणि तशी आग्रही मागणी भगवान श्री ज्ञानेश्वर महाराज यांनी आपली अनंत जन्माची तपसाधनेचे तेज पणाला लावून हे पसायदान मागून घेतलेले आहे. असे सुबुद्धी असलेले म्हणजेच बुद्धी योगी सिद्धपुरुष निर्माण होण्यासाठी त्यांना सिद्ध करून घेणारे, समर्थ सद्गुरु तितक्याच मोठ्या प्रमाणावर लागणार आहेत, म्हणून भगवंताला त्यांनी अशा सिद्ध पुरुषांचे जथेच्या जथे लोककल्याणासाठी आणि बुद्धी योगी सिद्ध पुरुष घडविण्यासाठी जनसामान्यात पाठवावेत ही आग्रहाची विनंती केली आहे. आणि तसा आदेश या महारावानी म्हणजेच ज्ञानेश्वर महाराजांनी इतर सिद्धांना दिला आहे. असे सिद्ध पुरुष निर्माण झाल्यानंतर त्यांच्या प्रभावाने राग द्वेष मोह अभिनिवेष हे क्लेश क्षिण होतील. आणि समाज सत्वगुण प्रधान व्हायला मदत होईल. म्हणजेच पर्यायाने या समाजाचे अध:पतनापासून रक्षण होईल.

आता आपणास कळाले असेल की ज्ञानेश्वर महाराज यांनी ही ज्ञानेश्वरी या जगताचे अध्यपतनापासून कसे रक्षण करील याचा वस्तू पाठ या ग्रंथातून दिला आहे.यात अनेक दिव्य प्रयोग दिले आहेत. साधकांनी ते प्रयोग स्वतःची पात्रता वाढवून आणि श्री गुरुच्या कृपेने मिळवायचे असतात. आणि पूर्णत्वास न्यायचे असतात.

अशा रीतीने ज्ञानेश्वरी हा ग्रंथ निश्चितच या कलि युगाला अध:पतनापासून वाचविणारा महान ठेवा आहे. यात किंचितही शंका नाही.

सिद्ध पुरुषांचे सामर्थ्य कसे असते हे जाणण्यासाठी नुकतेच आळंदी येथे केलेला एक प्रयोग लक्षात घेण्यासारखा आहे.

काही लोकांना असे अनुभवास आले की ज्ञानेश्वर माऊलीची समाधी असणाऱ्या आळंदीच्या परिसरात कितीही लोक येवोत त्यांच्यात सद्भाव, भक्ती जागृत होते. विकारांना थोडासा लगाम लागतो. हे याच क्षेत्रात आल्यावर कसे काय घडते ?हा प्रश्न पडला. काही लोकांनी वैज्ञानिक प्रयोग करून पहावे म्हणून अल्फा रेज चा संदेश टिपणारे उपकरण आणले आणि त्यांच्या हे लक्षात आले की, माऊली च्या समाधी स्थानापासून दहा किलोमीटर वर हवेत आणि २२ किलोमीटर रुंद परिसरात सर्वत्र अल्फा रे चा प्रभाव दिसून आला.

समाधी अवस्थेत जेव्हा योगी असतो ,तेव्हा ही दिव्य किरणे त्याच्या मस्तकातून बाहेर प्रस्फुटीत होत असतात,

आणि त्यांच्या संपर्कात जो कोणी येईल, त्याचा रजो गुण आणि तमोगुण कमी होऊन, सत्वगुण प्रभावशाली होऊ लागतो.

माऊली समाधीस्थ होऊन आज साडेसातशे वर्षे झाली. आजही इतक्या प्रचंड प्रमाणात अल्फा रे चा वर्षाव समाधी स्थानातून बाहेर पडतो आहे. तर ज्यावेळेस माऊली प्रत्यक्ष देहानीशी हजर होते, त्यावेळेस त्यांचा प्रभाव किती दूरपर्यंत जात असेल?ज्ञानेश्वरीत दिलेले दिव्य प्रयोग हे गुरूच्या मुखातून त्यांच्या आज्ञेने प्रत्येकाने कसोशीने करावेत व स्वतः विकसित होण्या सोबतच अवती भवतीचा संपूर्ण परिसर सत्व गुण प्रधान करून या देशाला सुजलाम सुफलाम करण्याकडे वळावे ही इच्छा व्यक्त करून हा भाग इथेच संपवितो.

****

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

राक्षसान् मारयित्वा च तारयसि सुरान् तथा।
कृत्यापि त्वं भवानीति शक्तिरपि त्वमेव हि।।९२।।

राक्षसांना मारतेस व तूच देवांना संकटातून वाचवतेस. तूच कृत्या, भवानी आहेस. तूच शक्तीही आहेस.

ये त्वां स्मरन्ति तेषां च प्रियाण्येव भवन्ति हि।
बालकस्य किमिष्टं तज्जानासि मातृके शिवे।।९३।।

जे तुझे स्मरण करतात, त्यांचे प्रियच होते. हे शिवे, माते, बालकाचे इष्ट काय, ते तूच जाणतेस.

अथ मानसपूजा।

दृष्ट्वा मुखं च ते देवि सुखकरं मनोहरम्।
नेत्राभ्यामागतं तोयमाचमनं समर्पये।।९४।।

हे देवी, तुझे मनोहर व सुखकर असे मुख पाहून डोळ्यांत पाणी आले तेच आचमन म्हणून समर्पित करतो.

तण्डुलाक्षदरूपेण समर्पयामि भावनाः।
हृदि समागतास्तेऽम्ब प्राप्ते हि तव दर्शने।।९५।।

हे अंबे, ज्या भावना तुझे दर्शन प्राप्त झाल्यावर हृदयात एकत्र आल्या, त्या भावनारूपी तंडुलाक्षदा समर्पित करतो.



## आरोग्य संजीवनी

### रक्ताभिसरण संस्थेचे शुद्धीकरण गरजेचे आहे, कारण...

ज्योतिर्मय साहित्य

१) जेवणाच्या लगेच आधी, जेवतांना मध्ये-मध्ये आणि जेवणानंतर लगेच पाणी प्यायचे नाही. कारण त्यामुळे जठराग्नी विझते, पाचक रस पातळ होतात त्यामुळे खाल्लेले अन्न पचत नाही. त्यामुळे जेवणाच्या किमान आर्धा तास आधी आणि जेवणानंतर एका तासानेच पाणी प्यावे.

२) पुरेसे आणि शिस्तबद्ध पद्धतीने पाणी प्यावे - पुरेसे म्हणजे २० किलो वजनाला १ लिटर पाणी लागते म्हणजेच ६० किलो वजन असेल तर ३ लिटर पाणी आवश्यक आहे, अती नको वा कमीही नको. शिस्तबद्ध पद्धतीने म्हणजे पाणी नेहमी बसून प्यावं, उभं राहून पिऊ नये. पाणी नेहमी ग्लास तोंडाला लावून प्यावं, वरुन पिऊ नये. आणि महत्वाचं म्हणजे पाणी चावून खावे म्हणजे गटागट न पिता जास्तीत जास्त लाळ मिसळून सावकाश पिलं पाहिजे कारण लाळ अल्कलाईन (क्षारीय) असते, ती दर मिनिटाला साधारण ०.५ बनत असते, ती जास्तीत जास्त पाण्यासोबत पोटात जाणे गरजेचे असते. कारण त्यामुळे पोटातील ॲसिडीक वातावरण नॉर्मल (सामान्य) व्हायला मदत होते आणि पोटातील ॲसिडीक वातावरण जेवढं नॉर्मल (सामान्य) होईल तेवढं वात-पित्त-कफ संतुलित राहून आपण निरोगी राहतो.

पाणी पुरेसे आणि शिस्तबद्ध पिण्यात आलं तरच किडनी ही गाळणी व्यवस्थितपणे शरीरशुद्धी करते.

३) जागरण टाळणे - रात्री १० च्या आत झोपलंच पाहिजे. कारण रात्री १० च्या आत झोपलं तरच आपण रात्री ११ ते ३ या वेळेत गाढ झोपेत असू आणि या वेळेत गाढ झोपेत असलो तरच यकृत () ही गाळणी व्यवस्थितपणे शरीरशुद्धी करते, अन्यथा शरीरशुद्धी व्यवस्थित होत नाही.

४) सुर्यास्तानंतर शक्य तितके लवकर जेवावे - सुर्यास्तानंतर आपली जठराग्नी शांत व्हायला लागते. त्यामुळे सुर्यास्तानंतर शक्य तितक्या लवकर जेवावे. खरं तर सुर्यास्तानंतर काहीच खाल्लं नाही पाहिजे. पण आपल्या लोकांचा स्वयंपाक लवकर होत नसल्याने सुर्यास्तानंतर किमान शक्य तितक्या लवकर तरी जेवावे.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

५) रात्री जेवलं की लगेच झोपणं टाळावे - जेवलं की लगेच झोपलं तर खाल्लेले पचत नाही आणि न पचलेलं सडून विषारी द्रव्ये (टोक्सिन्स) तयार होतात. त्यामुळे रात्रीचं जेवण आणि झोपणं यामध्ये २-३ तासांचे अंतर अवश्य असावे.

६) ताण-तणाव (स्ट्रेस) टाळावा - ताण-तणावांमुळे शरीरात रासायनिक प्रक्रिया घडून विषारी द्रव्ये तयार होतात. त्यामुळे ताण-तणाव नियंत्रित राहण्यासाठी नियमितपणे व्यायाम व ध्यान (मेडिटेशन) करावे.

७) विरुद्ध आहार टाळावा - विरुद्ध आहार शक्यतो दूध-दही याबाबतीत घडतो. जेवतांना दूधाची खिर खाऊ नये किंवा जेवणानंतर लगेच दूध पिऊ नये. कारण दूधात मीठ टाकलं तर दूध नासते, मग जेवणात मीठ असतेच त्यामुळे जेवतांना किंवा जेवणानंतर लगेच दूध पिलं तर दूध नासण्याची प्रक्रिया पोटात चालू होते आणि त्यामुळे पोटात रासायनिक प्रक्रिया घडून विषारी द्रव्ये तयार होतात म्हणून याला विरुद्ध आहार म्हणतात.

तसेच दही रात्री खाणंही विरुद्ध आहार आहे कारण दही पचवण्यासाठीचे पाचक रस (एंझ्याम्स) आपल्या शरीरात दुपारीच बनत असतात त्यामुळे दही दुपारीच खावे. रात्री दही पचवण्यासाठीचे पाचक रस (एंझ्याम्स) बनत नसल्यामुळे रात्री दही पचत नाही उलट सडून विषारी द्रव्ये तयार होतात त्यामुळे याला विरुद्ध आहार मानलं जातं.

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

युद्धा नंतर राम लक्ष्मणास म्हणाले तू इंद्राला बोलाव व त्याला सर्व वानर जे लढताना मेले त्यांना अमृत पाजवून उठवायला सांग.

लक्ष्मण म्हणे तुम्ही आपल पोटे वाटतात. तुम्ही केवळ वानरांना जिवंत करण्यास सांगत आहात पण राक्षसांना नाही.राम म्हणाले'' आपण व रावण युद्ध करतान ते राक्षस आपल्या बाणांनी मेले त्यावेळी त्यांचे तोंड माझ्या कडे होते. त्यामुळे ते राक्षस असून मुक्त आधीच झाले. पण वानराचे तोंड राक्षसाकडे होते.ते मेले ते त्यांचे तोंड पाहून मेले म्हणून नरकात जातील. म्हणून यांना अमृत पाज असे सांगितले.हा प्रसंग अद्भुत रामायणात आला आहे.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

युद्ध चालू असताना एकदा रावणाने सितेचे मायावी प्रेत समोर आणून टाकले. सर्व म्हणु लागले आता थांबा आता युद्ध कोणासाठी करायचे? सीता तर मरून पडली आता परत चला. हनुमान म्हणे हे शक्य नाही.देवाचा खरा भक्त देवाच्या विरहात कधी मरत नाही. आणि मेला तर तो खरा भक्त नाही.म्हणून सीता मरू शकत नाही.

चक्रवाक व चक्रवाकी यांचा संवाद. एक चक्रवाक आणि चक्रवाकी या पक्षांची जोडी होती. हे दोघे पती-पत्नी एकमेकावर खूप प्रेम करीत. एकदा प्रभू रामचंद्र या झाडाखाली उभे होते तिथेच त्यांचे संभाषण चालू होते. चक्रवाकी तिच्या पतीस म्हणाली अहो ,रामाचे आपल्या पत्नीवर किती प्रेम आहे पहा ना !ते आपल्या पत्नीच्या शोधार्थ ईथवर आले आणि त्यांनी एवढे मोठे भीषण युद्ध आरंभिले. (क्रमशः)

# आझाद हिंद सरकारचे खरे सैनिक-शाह नवाझ खान

**ज्योतिर्मय साहित्य**

ब्रिटीश साम्राज्याचा ध्वज उतरवल्यानंतर दिल्लीच्या लाल किल्ल्यावर तिरंगा फडकवणारा पहिला भारतीय म्हणून शाह नवाझ खान यांनी इतिहास रचला हे फार कमी लोकांना माहिती असेल. १९४५ च्या उत्तरार्धात आणि १९४६ च्या सुरवातीला भारतीय राष्ट्रीय सैन्यातल्या (इंडियन नॅशनल आर्मी-आयएनए. जी आझाद हिंद सेना म्हणूनही ओळखली जाते.) हजारो सैनिकांना युद्धकैदी करून ब्रिटिशांनी आग्नेय आशियातून भारतात आणलं होतं. आयएनए बद्दलची बातमी सबंध भारतीय उपखंडात वणव्यासारखी पसरली होती. युद्धकाळात ब्रिटिशांच्या प्रचारयंत्रणेनं ती दाबून टाकली होती. शाह नवाझ खान, प्रेमकुमार सहगल आणि गुरुबक्षसिंग धिल्लन या आयएनए च्या तीन अधिकाऱ्यांवर देशद्रोहाचा ठपका ठेऊन (ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध युद्ध पुकारल्यानं) दिल्लीत लाल किल्ल्यावर त्यांच्यावर खटला चालवण्याच्या ब्रिटिशांच्या निर्णयावर भारतातून उठाव होत होता. त्यांच्या समर्थनार्थ मोठ्या प्रमाणात सामूहिक जनआंदोलन चळवळ उभी राहिली. भारतातील जनमत आयएनए च्या मागे भक्कमपणे उभं होतं. या उठावामध्ये नुसते मुंबई आणि कलकत्त्यातच शेकडो लोक मारले गेले. सबंध भारतात वाढत्या धार्मिक आणि राजकीय तेढीला न जुमानता सर्व थरांमधून आयएनए ला पाठिंबा देणारे मोर्चे निघत होते. त्यामागोमाग फेब्रुवारी १९४६ मध्ये या सर्व घडामोडीमुळे हवाई दलात, लष्करात तसेच नेव्हीमध्ये सैनिकांच्या मनात भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला बळ देण्याचे तसेच आपलाही सहभाग असावा यासाठी चलबिचल चालू झाली होती. रॉयल इंडियन नेव्ही मधल्या भारतीय खलाशांनी उठाव केला. उठावाची सुरुवात मुंबईत होऊन तो पूढे कराची आणि कलकत्त्यात पसरला. ब्रिटिश-भारतीय लष्करात आणि हवाई दलातदेखील बंड होत असल्याची कुणकुण होती. त्यामुळे ब्रिटीशांच्या साम्राज्याला अखेरची घरघर लागली. ब्रिटिशांनी एकंदर परिस्थितीचा अंदाज घेतला आणि भारतीय उपखंडातल्या त्यांच्या विस्कळीत माघारीचं अखेरचं पर्व सुरु झालं.



शाह नवाझ खान, प्रेमकुमार सहगल आणि गुरुबक्षसिंग धिल्लन यांच्यावर देशद्रोहाचा, खुनाचा व छळाचा आरोप ठेऊन दिल्लीच्या लाल किल्ल्यावर खटला चालविण्यात आला. सर तेजबहादुर सप्रू, जवाहरलाल नेहरू, असफ अली, भुलाभाई देसाई, कैलाश नाथ काटजू आणि इतरांनी त्यांचा बचाव केला. या सर्वांना युद्धकैदी म्हणून वागविले पाहिजे कारण ते पगारी भाडोत्री सैनिक नव्हते तर कायदेशीर सरकारचे, स्वतंत्र भारताचे हंगामी सरकारचे किंवा आझाद हिंद सरकारचे खरे सैनिक होते. ''कितीही चुकीची माहिती दिली गेली असेल किंवा अन्यथा ते त्यांच्या देशाप्रती देशभक्तीच्या कर्तव्यात होते''. आणि म्हणून त्यांनी स्वतंत्र भारतीय राज्याला त्यांचे सार्वभौम म्हणून ओळखले. ब्रिटीश सार्वभौम या सर्वांना मान्य नाही. खटल्यादरम्यान शाह नवाझ खान यांनी भारतीय ब्रिटीश सैन्यात भारतीय सैनिकान विरुद्ध ब्रिटिश सैनिकांना दिलेल्या भिन्न वागणुकीचा उल्लेख केला. त्यांच्या साक्षीत खान यांनी साक्ष दिली की, कोणत्याही भारतीय अधिकाऱ्याला डिव्हिजनची कमांड देण्यात आली नव्हती. आणि फक्त एकालाच ब्रिगेडची कमांड करण्याची परवानगी होती.

शाह नवाझ खान यांना न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली पण ब्रिटीश भारतीय लष्कराच्या कमांडर-इन-चीफ ने ती शिक्षा आयुष्यमान कारावासात परावर्तित (बदलण्यात) केली. शाह नवाझ खान साधारणपणे ८ महिने कैदेत होते. ब्रिटिश सैन्यप्रमुख क्लॉड ऑकिनलेक यांनी जनआंदोलनाचा व सार्वजनिक दबावाचा विचार करून शाह नवाझ खान यांना आणि त्यांच्यासहित इतर आयएनएचे प्रमुख अधिकाऱ्यांना शिक्षेची माफी दिली. लाल किल्ला खटला ( ) नोव्हेंबर १९४५ ते मे १९४६ दरम्यान झाला. या खटल्यामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीला बळकटी मिळाली आणि इंडियन नॅशनल आर्मीच्या सैनिकांसाठी जनआंदोलन मोठ्या प्रमाणात उभे राहिले. शाह नवाझ खान यांची १९४६ मध्ये सुटका झाली. सुटकेनंतर शाह नवाझ खान यांनी महात्मा गांधी आणि अब्दुल गफार खान यांच्यासोबत शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि नोआखाली दंगलग्रस्तांना मदत करण्यासाठी मदत केली. त्यांनी जाहीर केले की ते यापुढे महात्मा गांधींनी स्वीकारलेल्या अहिंसेच्या मार्गाचे अनुसरण करतील आणि ते काँग्रेस पक्षात सामील झाले.




शाह नवाझ खान यांचा जन्म २४ जानेवारी १९१४ रोजी हिंदुस्थानच्या पण आताच्या पाकिस्तानच्या रावळपिंडी जिल्ह्यातील माटोर या गावी एका पंजाबी जंजुआ राजपूत कुटुंबात झाला. त्यांचे वडील लेफ्टनंट टिक्का खान यांनी सुमारे ३० वर्षे ब्रिटिश भारतीय सैन्यात सेवा बजावली. ते ५८ व्या वॉन रायफल्स (फ्रंटियर फोर्स) लष्करी तुकडीशी संबंधीत होते. शाह नवाझ खान यांच्यामध्ये लहानपणापासूनच कुटुंबातील कर्तुत्व, सैन्यामधील वातावरण या सर्वाचा परिणाम होऊन त्यांनीही ब्रिटीश भारत सैन्यात आपले करीअर करण्याचा ध्यास घेतला होता. प्रिन्स ऑफ वेल्स रॉयल इंडियन मिलिटरी कॉलेज डेहराडून येथे त्यांनी शिक्षण घेतले आणि ब्रिटिश सैन्यात ते भरती झाले. त्यावेळी भारत पारतंत्र्यात होता आणि इंग्रजांच्या सैन्यासाठी लाखो भारतीय युवक काम करीत होते. इंग्रजाची जगामध्ये ज्या ज्या ठिकाणी वसाहत होती त्या त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात हिंदुस्थानी युवक लष्कराच्या माध्यमातून या वसाहतींवर इंग्रजांसाठी काम करीत होते. इंग्रजांचा जगावरील सत्तेचा सुवर्णकाळ भारतीय तरुणांच्या लष्करातील सहभागाचा परिपाक होता. दुसऱ्या महायुध्दात ते १४ व्या पंजाब रेजिमेंटमध्ये कॅप्टन इन्स्ट्रक्टर होते. १९४२ साली जपानी सैन्याने इंग्रजी सैन्याचा सिंगापूर येथे पराभव केला. सुमारे चाळीस हजार भारतीय ब्रिटीश सैनिक व अधिकारी जपानी सैन्याच्या तावडीत सापडले. या युद्धबंद्यामध्ये शाह नवाझ खानही होतेसिंगापूरमध्ये युध्दकैदी म्हणून काम करणाऱ्या भारतीय लष्करी युद्धकैद्यांनी मोठ्या प्रमाणात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रभावी भाषणाने आणि नेतृत्वाने इंडियन नॅशनल आर्मी-आझाद हिंद सेनेत प्रवेश केला. स्वतंत्र भारतासाठी लढण्यास सांगणाऱ्या नेताजी यांच्या भाषणांनी मी संमोहित झालो. भारताचे खरे चित्र आमच्यासमोर नेताजी या व्यक्तिमत्वाने ठेवले आणि माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच मी एका भारतीयाच्या नजरेतून भारत पाहिला, असे शाह नवाझ खान यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहून ठेवले आहे, शाह नवाझ खान १९४३ मध्ये आझाद हिंद सेनेत सामील झाले. नेताजी यांनी हंगामी भारत सरकार ची स्थापना २१ ऑक्टोबर १९४३ रोजी सिंगापूर येथे केली होती.

हे सरकार भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील एक महत्वपूर्ण व ऐतिहासिक घटना होती. ज्याला जर्मनी, जपान, इटली, फिलिपिन्स, कोरिया, आयर्लंड आणि इतर काही देशांनी मान्यता दिली होती. नेताजींनी या सरकारच्या माध्यमातून ब्रिटिशांच्या विरोधात स्वातंत्र्यसंग्रामाला नवीन वेग दिला आणि भारतीय राष्ट्रीय सैन्यामध्ये भरती करीत पुर्नसंघटन केले. नेताजी बोस यांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारच्या मंत्रीमंडळात शाह नवाझ खान यांचा समावेश होता. या हंगामी सरकारला ''अर्जी हुकुमत-ए-आझाद हिंद'' असे म्हंटले जायचे. नेताजी स्वतः या सरकारचे अध्यक्ष व प्रधानमंत्री होते. तसेच युद्ध व परराष्ट्र मंत्रालयाची जबाबदारीही त्यांनीच सांभाळली.

**(क्रमशः)**

# युगंधरा प्रतिष्ठानतर्फे दुर्गा नारी शक्ती पुरस्काराचे वितरण तसेच श्री रेणुका देवी स्तोत्राचे प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

**बिडकीन-** संभाजीनगर येथिल युगंधरा प्रतिष्ठानतर्फे,बिडकीन येथील प्रसिध्द कोनार्डे हॉस्पिटलच्या डॉक्टर माधुरी कोनार्डे यांच्या निवासस्थानी शनिवार दि.२७ सप्टेंबर शनिवार रोजी शारदा मंदिर सख्यांच्या स्नेहमिलनाच्या कार्यक्रमात युगंधरा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या व सौ सुनिता कावसनकर यांनी संपादित केलेल्या ''श्री रेणुका माता स्तोत्राचे प्रकाशन शारदा मंदिरच्या उपस्थित सर्व सख्यांच्या हस्ते झाले.



तद्नंतर युगंधरा प्रतिष्ठानच्या अध्यक्षा, सौ.सुनिता दिपक कावसनकर यांनी सर्व उपस्थित सख्यांना ''युगंधरा दुर्गा नारी शक्ती सन्मानाने, सन्मानपत्र देऊन सन्मानित केले.. याप्रसंगी डॉ माधुरी कोनार्डे ज्या यांच्यातर्फे दांडिया,विविध खेळ,उखाणे तसेच मनिषा कानडे वायचळ यांच्या वाढदिवसाचा कार्यक्रम व फराळाचा कार्यक्रम पार पडला.. या कार्यक्रमाला डॉ.माधुरी कोनार्डे ज्या बिडकीन येथे ३० वर्षापासून निस्पृहपणे वैद्यकीय सेवा देत आहेत व सुनिता कावसनकर, अध्यक्षा, युगंधरा प्रतिष्ठान,प्रक्राशिका युगंधरा प्रकाशन व संपादिका, युगंधरा साप्ताहिक यांच्यासह शैक्षणिक समुपदेशिका, विश्वमांगल्य छात्रसभा संरक्षक व दासबोध व ज्ञानेश्वरी अभ्यासक स्वाती ठोसर-चौधरी, मधील राजपत्रित अधिकारी मनिषा कानडे-वायचळ,प्रिया फडके-मिरखेलकर बँक शाखा व्यवस्थापक, सुवर्णा पाटील-गिरमे,संचालक आ.कृ.वाघमारे प्रशाला, डॉ. कल्पना पाटील-देशमुख, लिना जोशी-त्रिवेदी सहशिक्षिका,संस्कार प्रबोधिनी प्रशाला,उषा दळे-पवार, शिक्षिका,माया कुलकर्णी-आराध्ये विमा कर्मचारी ,ज्योती कुळकर्णी महाजन बँकर, माधवी कवठेकर-निलंगेकर,इंजिनियर, आशा पवार-पाटील,किशोरी महाजन-मिरजगावकर शोभा भाले-धर्माधिकारी, उपस्थित होते.



# होल्डिंग हँड्स पंजाबच्या गुरुदासपूर शाखेतर्फे पूरग्रस्तांसाठी मोफत औषध वाटप

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर -** पंजाबमध्ये अलिकडच्या काळात आलेल्या पुरामुळे येथील पूरग्रस्तांना विविध आजारांचा सामना करावा लागत आहे. याची गंभीर दखल घेत होल्डिंग हँड्स पंजाबच्या गुरुदासपूर शाखेने संगोर दोरंगला गावात मोफत वैद्यकीय शिबिराचे आयोजन केले.

वैद्यकीय तपासणीनंतर मोफत औषधे आणि अन्नपदार्थांचे वाटप करण्यात आले. डॉ. काहलो आणि डॉ. नितीन पठानिया यांनी आरोग्य जागरूकतेबाबत मार्गदर्शन केले. यावेळी शाळकरी मुलांची ही संख्या अधिक होती.


हे आरोग्य शिबिर यशस्वी होण्याकरिता रमण पठानिया. पंजाब टीमच्या प्रमुख पूनम शर्मा व होल्डिंग हँड्स पंजाब टीम यांनी प्रयत्न केले.

होल्डिंग हँड्स ही संस्था छत्रपती संभाजी नगरची असून देश विदेश पातळीवर या संस्थेचे कार्य चालते. होल्डिंग हँड्स ही संस्था राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सबलीकरण तसेच विविध सामाजिक क्षेत्रात काम करते.











# मेघा घाडगेच्या संकल्पनेतून ''संगीत बारी ते वारी

**ज्योतिर्मय साहित्य**

महाराष्ट्राच्या लोककलेत खोलवर रुजलेली बारी आणि वारीची परंपरा आता रंगभूमीवर नव्या रुपात अनुभवायला मिळणार आहे. 'संगीत बारी ते वारी' हे नवे संगीतमय नाटक रसिक प्रेक्षकांसाठी अविस्मरणीय मेजवानी ठरणार आहे. या नाटकात वारीची भक्तीभावाची झलक, लोककलेचा ठसा, तसेच जीवनातील संघर्ष आणि आनंद यांचे अप्रतिम चित्रण पाहायला मिळणार आहे. गायन, वादन, नृत्य आणि नाटक यांचा संगम घडवणारे हे प्रयोग प्रेक्षकांना रंगतदार अनुभव देणार आहेत.




मेघा वि.रा.एंटरटेनमेंट निर्मित संगीत बारी ते वारी या नाटकाची संकल्पना मेघा घाडगे यांची असून या नाटकाचे लेखन नचिकेत दांडेकर यांनी केलं आहे. नाटकाचे दिग्दर्शन संकेत पाटील यांनी केली आहे. नृत्यदिग्दर्शन योगेश देशमुख यांचे असून, संगीताची जबाबदारी आशुतोष वाघमारे यांनी सांभाळली आहे. आणि गीते अनिकेत कदम यांची आहेत. नेपथ्य देवाशिष भरवडे, प्रकाशयोजना कुलभूषण देसाई आणि प्रणाली, मेघा, प्रज्ञश्री यांनी केलेल्या वेशभूषेचा अप्रतिम मिलाफ या नाटकात अनुभवायला मिळणार आहे.

मराठी मनोरंजन विश्वातील लावणी सम्राज्ञी मेघा घाडगे मुख्य भूमिका साकारणार आहे.त्यांच्या सोबत संजना पाटील,शिरीष पवार,विद्याधर नामपल्ले आणि इतर कलाकारही या नाटकात आहेत.सप्तसुर म्युझिक चॅनल म्युझिक पार्टनर आहे. खुशबू जाधव या नाटकाच्या सहनिर्माती असून आगामी काळात महाराष्ट्रभर हे नाटक रसिकांसमोर येणार आहे. लोककलेची परंपरा रंगभूमीवर नेणारे हे नाटक नक्कीच प्रेक्षकांच्या मनात घर करून राहील, असा विश्वास या नाटकाचे निर्माती मेघा घाडगे व्यक्त करतात.

**आशिष निनगुरकर, मुंबई**



**या देवी सर्वभूतेषु शक्ति-रूपेण संस्थिता।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।**



# अंबाजोगाईची-श्री योगेश्वरी देवी

**ज्योतिर्मय साहित्य**

बीड जिल्ह्यात असलेल्या अंबाजोगाईला मराठवाड्याची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखले जाते. हे केवळ तीर्थक्षेत्र नसून इतिहास, कला आणि भक्ती यांचा अनोखा संगम आहे.असे म्हटले जाते. येथील सण आणि उत्सव आनंदाने भरलेले असतात. नवरात्र, दसरा या काळात अंबाजोगाई भक्तीमय वातावरणाने न्हाऊन निघते. सजावट, पारंपरिक लोकनृत्ये आणि भक्तिगीते यामुळे येथे उत्सवांचे आकर्षण विशेष असते. इतिहासप्रेमी, आध्यात्मिक शोधक आणि कलेचे अभ्यासक यांच्यासाठी अंबाजोगाई मध्ये काहीतरी खास आहे. येथे मंदिरांचे भव्य वास्तुकलेचे नमुने आहेत. साहित्य व तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातही या शहराला महत्त्वाचे स्थान आहे.

मुकुंदराज आणि संत दासोपंत यांसारख्या थोर व्यक्तींशी या भूमीचा संबंध आहे.मराठवाड्यातील सांस्कृतिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे अंबाजोगाई परळी वैजनाथपासून ३५ कि. मी. अंतरावर आहे. अंबेजोगाई येथील योगेश्वरी देवीचे भव्य मंदिर पुरातन काळापासून प्रसिद्ध आहे. या मंदिराची रचना हेमाडपंती स्थापत्यशैलीची असून मंदिर उत्तराभिमुख आहे. देवळास चारही बाजूने महाद्वार आहेत. मंदिराचे बांधकाम व त्यावरील शिल्पे पाहून मन थक्क होते. दगडी खांब व त्या वरील बारीक नक्षीकाम अतिशय रेखीव आहे. उत्तर महाद्वाराच्या बाहेर सर्वेश्वर तीर्थ आहे. मंदिराच्या परिसरात काही सत्पुरूषांच्या समाध्या आहेत. पश्चिम दरवाजाला लागूनही अनेक देवदेवतांची मंदिरे आहेत. नवरात्रात येथे महोत्सव असतो. मार्गशीर्ष महिन्यातही येथे उत्सव असतो.

शहरापासून थोड्या अंतरावर बालाघाटातील एका डोंगरात मराठीतील आद्यकवी मकुंदराजांची समाधी आहे. हा संपूर्ण परिसर शांत व सुंदर आहे. जवळच जयंती नदी डोंगराच्या कड्यावरून खाली दरीत कोसळते. या दरीस अश्वदरी असे म्हणतात. संतकवी दासोपंत यांनी अंबेजोगाईस वास्तव्य करून आपली साहित्य रचना केली. त्यांचे निवासस्थान एकमुखी दत्तात्रेयाचे मंदिर आहे. मार्गशीर्ष महिन्यात येथे दत्त जयंतीचा उत्सव साजरा केला जातो. अमलेश्वर, सकलेश्वर ही मंदिरे जांभुळवेट व अनेक सिद्ध पुरूषांची साधनास्थाने या परिसरात

देवी योगेश्वरी हे साक्षात आदिमाया आदिशक्तीने घेतलेले रूप. ही देवी अंबाजोगाई येथे वास्तव्यास आहे. दांतसूर नावच्या एका राक्षसाने प्रचंड उन्माद माजवला होता. त्याचा वध करण्यासाठी देवीने योगेश्वरीचे रूप घेतले आणि त्याचे पारिपत्य केले. दांतसूरचा वध केल्यानंतर देवी एका आंब्याच्या झाडाखाली विसावली, म्हणून या जागेस जोगाईचे आंबे आणि पुढे आंबेजोगाई, असे नाव प्रचलित झाले. दांतसूरचा वध केला म्हणून ही देवी दांतसूरमर्दिनी झाली.

तांदळ्याच्या रूपातली ही योगेश्वरी कुमारिका आहे. त्यामागे एक कथा सांगितली जाते, परळीच्या वैजनाथांचा योगेश्वरीशी विवाह निश्चित करण्यात आला. कोकणातून देवी आणि वऱ्हाडी मंडळी परळीला निघाले. लग्नाचा मुहूर्त ठरला; पण तो मुहूर्त टळून गेला आणि देवीचा विवाह झाला नाही. यामुळे देवी कुमारिकाच राहिली आणि परत कोकणात न जाता, देवी ज्या ठिकाणी राहिली, ते आजचे आंबाजोगाई. ११व्या शतकाच्या सुमारास कोरल्या गेलेल्या हत्तीखाना लेणी किंवा शिवलेणी, हे जोगाईचे माहेर म्हणून ओळखू जाऊ लागले.

देशावरची ही देवी कोकणातील चित्पावन ब्राह्मणांची (कोकणस्थ) कुलदेवता आहे. हा संबंध सांगणारी कथा




भगवान परशुरामांशी निगडित आहे. परशुरामांनी अपरांत, म्हणजे कोकण भूमीची निर्मिती केल्यावर, त्या भूमीवर वास्तव्य करण्यासाठी काही कुटुंबे कोकणात नेली. तिथे समुद्र किनाऱ्यावर अर्धमृत अवस्थेत पडलेल्या १४ व्यक्तींना परशुरामांनी संजीवनी दिली. या १४ व्यक्तींचा विवाह करण्यासाठी भगवान परशुरामांनी अंबाजोगाईतून वधू नेल्या. वधू नेताना योगेश्वरीने एक अट घातली, ज्यांच्याशी या मुलींचा विवाह होईल, त्यांच्या कुलाची योगेश्वरी ही कुलदेवता असेल. अशा अख्ख्यायिका आहेत.




अंबाजोगाई हे क्षेत्र फार प्राचीन आहे. यादव राजवटीत हे एक समृद्ध शहर होते. चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, नंतर निजाम अशा विविध राजयकर्त्यांनी या भूमीवर राज्य केले आहे. जयंती नदीच्या पश्चिम तटावर अंबेचे मंदिर आहे. मंदिराला तटबंदी असून उत्तर, दक्षिण आणि पूर्व दिशांना दरवाजे आहेत. मंदिराच्या प्रांगणात दोन दीपमाळा आहेत. देवीचे मंदिर यादवकाळात बांधलेले असून त्याचा जीर्णोद्धारही झालेला दिसतो. एका यादवकालीन शिलालेखानुसार या मंदिराला तीन कळस होते. मुख्य मंदिर दगडी असून, एका छोट्या गभाऱ्यात चबुतऱ्यावर अंबिकेचा मुखवटा आहे आहे. देवी उत्तराभिमुख आहे. मंदिराच्या सभामंडपात गणपती आणि देवीची उत्सवमूर्ती आहे. मंदिराच्या बाहेर उत्तर दिशेस होमकुंड असून, उत्सवाच्या दरम्यान होणाऱ्या शतचंडीचा होम केला जातो. मंदिर परिसरात नगारखान्याजवळ दांतसुराची मूर्ती आहे. मंदिरावर असलेला पाच मजली कळस आहे. उत्तम कलाकृती असलेला मराठा शैलीतील या कळसावर अनेक देवदेवतांच्या मूर्ती आहेत. अठरा हातांच्या गणेशाची स्त्री रूपातील मूर्ती, ही एक अद्वितीय गोष्ट कळसावर आहे.

देवीला रोज पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो, तसेच तांबुलाचाही प्रसाद असतो. देवीचा मुख्य उत्सव हा मार्गशीर्ष महिन्यात पौर्णिमेला, म्हणजेच दत्त जयंतीला साजरा केला जातो. अश्विन महिन्यातील शारदीय नवरात्र उत्सवही तितक्याच मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. नवरात्र उत्सवात दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी असते. आंबेजोगाई पासून परळी वैजनाथ आणि तुळजापूर ही जवळ असल्यामुळे तेथील दर्शनाचा लाभ भाविकांना घेता येतो.

***

---

# नवरात्र म्हणजे : पंचतत्वाचा जागर, पर्यावरणाची आराधना

**ज्योतिर्मय साहित्य**

नवरात्र म्हणजे फक्त विविध रंगांच्या साड्या परिधान करणे फेर धरून गरबा खेळणे एवढेच नसून या प्रकृती, निसर्गापरी नतमस्तक होऊन पर्यावरणाची आराधना, पंचतत्वाचा जागर करणे होय. नवरात्रीत मांडलेला घट व अखंड ज्योत हे पंचतत्वाचे धोतक होय. हजारो वर्षापासून निसर्ग आपली आई बनून काळजी घेत आलेला आहे पण आपण मात्र या निसर्ग , पर्यावरण,पंचतत्वे (माती, जल, अग्नी,आप, वायू ) त्या सर्वांचा आधार म्हणजेच भूमाता विषयी अजूनही जागरूक नाही आहोत. आज जी ढगफुटी, अतिवृष्टी, पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झालेली आहे यालाही सर्वस्वी आपण जबाबदार आहोत हे मान्य करायला हवे.

विज्ञान, तंत्रज्ञानाच्या युगात भौतिक विकासाच्या हव्यासापोटी पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात रहास केलेला आहे. आपण स्वतःला बुद्धीवादी म्हणून घेतोय पण या बुद्धिवाद्यांनी साधलेला विकास खरंच पिढ्यानपढ्याची जोपासना करणारा आहे का ? हा प्रश्न मला भेडसावतो. माती, पाणी, आप, (आकाश) वायू , अग्नी हे आपले खरे पंचतत्वे याचा आपण कायम समतोल राखायला हवा.

बालपणी खेळताना पडलो खरचटलं तर अंगणातील माती जखम भरण्याची काम करायची पण आज मात्र जखमेवर माती लागली की इन्फेक्शन होते म्हणजेच प्रादुर्भाव होतो. कारण काय तर आज त्या मातीत जीवन शक्ती प्राणशक्ती कमी होऊन माती मरणासन्न अवस्थेकडे जात आहे म्हणजेच तिची विष गर्भता वाढत चाललेली आहे जर आपण येणाऱ्या पिढ्यांच्या समृद्ध आयुष्याचा विचार करत असून तर नक्कीच आपण आज या भूमातेची काळजी घ्यायला हवी म्हणजेच आज आपण या भूमातेची आई बनण्याची गरज आहे या निसर्गाची आई बनण्याची गरज आहे असं मला वाटतं. तिचं योग्य पोषण करून विष गर्भता कमी करून प्राणशक्ती वाढवण्याची जबाबदारी आपल्या वरती आज आलेली आहे. वाढती लोकसंख्या गगनचुंबी इमारती बनवताना औद्योगिक विकास साधताना निसर्गातील या पंचतत्त्वांची मोठ्या प्रमाणात आज हानी होत चाललेली आहे त्यावरून आपण आपल्या येणाऱ्या पिढ्यांसाठी मौत का कुवा खोदून ठेवत आहोत असे मला वाटते. आपलं शरीर हे याच पंचतत्वापासून बनलेले आहे आणि त्यातील माती म्हणजे खऱ्या अर्थानं आपल्या जगण्याचा आधार.

मातीतून जन्म
मातीतच जगणं
मातीतच विरन
आयुष्य हे
याच्यापलीकडे
आपल्या आयुष्याचा काहीही वेगळा अर्थ नाही कितीही विज्ञान, तंत्रज्ञानात्मक प्रगतीच्या मोठ्या मोठ्या गप्पा मारल्या तरी निसर्गाविषयी सज्ञानी असणं अधिक महत्वाचा आहे याचे भान आपल्याला असायला हवे. पंचतत्वांची आपली आपण जोपासना करायला हवी. हेच संस्कार आपण येणाऱ्या पिढ्यांवर करायला हवे. म्हणूनच निसर्गाची आई बनून तिची काळजी घ्यायला हवी. आज जी अतिवृष्टी, पूरग्रस्त परिस्थिती ओढवलेली आहे यालाही सर्वस्वी जबाबदार आपणच आहोत याचे भान आपण ठेवायला हवे. वाढत्या वैश्विक तापमानामुळे ईशान्य मोसमी वारे नैऋत्य मोसमी वारे व हिमालय वितळून निर्माण झालेला गरम हवेच्या दाबाच्या पट्ट्यांमुळे अनेक राज्यात भयावह पूरग्रस्त परिस्थिती ओढवलेली आहेआहे. पंजाब, महाराष्ट्र, राजस्थान, उत्तराखंड यांची डोळ्यात अश्रू आणणारी परिस्थिती हे मानवनिर्मितच संकट आहे याचे भान आपण ठेवायला हवे. म्हणूनच या नवरात्रीत आपण या पंचतत्वापरी म्हणजेच पर्यावरणा विषयी जागरूक राहून त्याच्या संवर्धनाची, संरक्षणाची जबाबदारी फक्त सांगे वांगे नाही तर आई बनून घ्यायला हवी. म्हणजेच आजपर्यंत हा निसर्ग, हे पर्यावरण आपली जसे आई म्हणून काळजी घेत होते आपले रक्षण करत होते तसेआज या पर्यावरणाची आई बनून आपण रक्षण करण्याची जबाबदारी घेण्याचा संकल्प आपण अखंड मानव जातीने करायला हवा तरच पुढील पिढ्यांना आपण सुंदर जीवन देऊ शकू.

नवरात्रीच्या निमित्ताने या भूमातेस कोटी कोटी प्रणाम...






धनश्री राजकुमार मुसने
चंद्रपूर मो. 76666 29184

---

## आजची माळ




**ज्योतिर्मय साहित्य**

अश्विन शुध्द नवमी

आज आपण देवीला नववी माळ वहाणार आहोत.नववी माळ वार मंगळवार सर्व मंगल करणारा अनुभूती पूर्ण क्षण. या नवदिवसांत आपण देवीची पूजाअर्चा मनोभावे केली . घटस्थापना नवघट वेदीवर नवमाळा पाने फुले काही घरी दररोज कुलधर्माच्या पध्दतीने षोडशोपचारे पूजा करून दररोज पंचपक्वानांचा नैवेद्य अर्पण केला जातो. भजन, देवी महात्म्य, देवीसुक्त, श्रीसुक्त,

शतचंडीयाग, नवचंडीयाग होमहवन, भोंडला, रासगरबा दररोज नानालंककाराच्या पूजेने यथाशक्ति मातेची पूजा केली आहे. मातेला आपली भोळी भाबडी सेवा रूजू असेल अशीच सेवा करून घे असा आशिर्वाद मागुया.

**सौ.ऊज्वला धर्माधिकारी**
**पुणे**

आज नवदिवसांचे पारणे असते यालाच घट उठले असेही म्हणतात. आज नव दिवसांचे पारणे फेडले जाते. कुलधर्म कुलाचार केला जातो. सप्तशती, नवचंडीचा याग होतो यातून एक प्रसन्न वातावरण तयार होते सात्विकता वाढते . गोंधळजाग्रणाने देवीला अनेक प्रकारच्या सृष्टीतील सृजनात्मक कथा सांगतल्या जातात. समाजातील चांगल्या व वाईट प्रथा कशा आहेत व वाईटावर विजय मिळवण्यासाठी आपण एकोप्याने समाजाला बांधून ठेवले पाहिजे हा विचार मांडला पाहिजे. असे आधूनिक नवरात्र उत्सव करूया ते खरे गोधळजाग्रणाचे रूप आजच्या काळात असावे असे वाटते.

देवीच्या वेगवेगळ्या रूपांचा उत्सव म्हणजे नवरात्र होय. शैलीपुत्री, ब्रम्हचारिणी चंद्रघटा, कुष्मांडी, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी सिध्दीदात्री अशा नवरूपात देवीची पूजा केली जाते.आपले सगळे सण ऊत्सव व्रते कुलधर्म कुलाचार हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जातात. आपण आधुनिक युगात वावरतो. आपण काय शिकलं पाहिजे तर संस्कृती सवर्धन केली पाहिजे . देवीच्या रूपात परस्त्रीला पाहिले पाहिजे. तिला मातेसमान वागणूक दिली पाहिजे.कालच आपण कन्यापूजनाचे महत्व समजून घेतले. आईला पत्निला,मुलीला परस्त्रियांना देवीच्या रूपात पाहिले पाहिजे. म्हणजे तरी बायका मुलींवर होणारे अत्याचार थांबतील. देवीमाता असे अत्याचार करणा-यांना धडा शिकवेल. नवरात्रात देवी समोर होम हवने करतात. आपण आधुनिक विचाराने प्रेरित होऊन ह्याचा ऊपयोग समाजाच्या ऊध्दारासाठी करूया होमात ज्या समिधा टाकतात तर आपण आपल्यातील वाईट विचार नष्ट होऊ दे म्हणून समिधा टाकु.

समाजातील दुर्बल लोकांना न्याय मिळू दे.

अत्याचार अन्याय, नुसता बोलघेवडेपणा असणा-या लोकांना चांगली बुध्दी दे. सर्वांना शिक्षण आरोग्य,ऐश्वर्यसंपन्न होऊ दे. समाजासाठी समाज झटला पाहिजे एकमेकांना मदत आदरभाव सामंजस्य,मैत्रभाव वाढीला लागो. अशी समाजरचना सर्वमान्य होऊ दे. किळसवाणे राजकारण नको आहे. तर समाजासाठी ध्येयाने प्रेरित असणारे जे जे कोणी सच्चे भारतीय असतील की ज्यांना खरचं *बलशाली भारत*बनवायचा आहे त्यांच्या हाताला यश दे. अशा अनेक मंगलमय आशीर्वादाची समाजाला गरज आहे यासाठी नवरात्राचा हा स्त्री शक्तिचा ऊत्सव लोककल्याणा साठी होवो.आपल्या सर्वाचे कल्याण करणारी अष्टभुजा देवी आहे मांगल्याचा जोगवा मागुन देवीला आज पंचपक्वांनाचा नैवेद्य अर्पण करूया

नैवेद्य दाखवल्या वर पानांचा देण्याची पध्दत आहे तो विडा आपण शब्दरूपात देऊ !

क्षमारूपी लवंग,वैराग्याचा कात सुबुध्दीचा वेलदोडा, वैराग्याची जायपत्री, अशा सर्व साहित्याने एकरूप झालेला विडा देवीला अर्पण करूया व नवरात्राची ही नववी माळ वाहून ‘‘आई राधा ऊदे ऊदे ‘‘अशा गजर करून नवदिवसांचे पारणे करूया

तू सच्चिदानंदप्रणवरूपिणी।।
सकल चराचरव्यापिनी।।
सर्गस्थित्यंतकारणी ।
मोक्षदायीनी, कमलानंदे
भवमोचनी ब्रम्हानंदे।।
आई दुर्गामातेच्या चरणीं नित्य वंदन

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559